REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 10 | JULY - 2023

# कौशल्याधिष्ठित शिक्षण: आजची गरज

डॉ. धनंजय बाबुरावजी कदम
माजी प्राचार्य, स्व. ज्ञानेश्वररावजी मेंघरे शिक्षण महाविद्यालय, कोंढा-कोसरा, ता. जि. भंडारा.

## प्रास्ताविक:



आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी आणि शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी राष्ट्रभावना, स्वाभिमानाबरोबरच व्यक्तिमत्त्वाचा व्यापक विकास करणाऱ्या सकारात्मक चळवळीची खऱ्या अर्थाने गरज निर्माण झाली आहे. याची जाणीव अनेक विचारवंतांनी व्यक्त केली आहे. शरीर, मन, बुद्धि, आत्मा या पंचकोश विकासनातून शिक्षण देण्याची गरज आहे. परंतु आजची पिढी विचार व कृतीशून्य आणि भाव, बुद्धीशून्य निर्माण होत असेल तर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. ही सद्यःस्थितीत असलेली शिक्षणाची वास्तविकता नाकारता येऊ शकत नाही. शंभर वर्षांपूर्वी जाणकारांनी शिक्षणाविषयी व्यक्त केलेली चिंता आजही कायम असून मनुष्यत्वाचा विकास घडविणाऱ्या शिक्षण पद्धतीत कौशल्याधिष्ठित शिक्षणप्रणालीचे महत्त्व विशद करण्याचा प्रयत्न पुढील विश्लेषणातून करण्यात आलेला आहे.

## कौशल्याधिष्ठित शिक्षण व गरज:

एखादे काम कमीत कमी वेळेत,जुजबी परिश्रमात व खर्चात सुव्यवस्थित आणि नीटपणे पूर्ण करण्याचे कसब म्हणजे कौशल्य होय. शिक्षण हे आपल्या जीवनाची संपूर्ण तयारी असल्याने शिक्षण कौशल्याधिष्ठितच असायला हवे. मानवी जीवनातील कौशल्याचे विशेष महत्त्व विचारात घेऊनच भारत सरकारने कौशल्य विकास आणि उद्यमिता मंत्रालयाची स्थापना केली. देशातील नागरिकांमध्ये विविध प्रकारची कौशल्ये विकसित करण्याची जबाबदारी या मंत्रालयावर सोपविण्यात आलेली आहे. कोणत्याही देशाच्या सर्वंकष विकासात कुशल आणि अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता असते. परंतु आपल्या देशात या दोन्ही प्रकारच्या मनुष्यबळात असंतुलन दिसून येते. यामुळे अकुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात तर अनेक क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची कमतरता निदर्शनास येते. याचा परिणाम म्हणून अकुशल मनुष्यबळ एका विशिष्ट मर्यादेनंतर अनावश्यक असल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेकारी निर्माण होते. बेकारी ही आपल्या राष्ट्रातील मोठी समस्या बनली आहे. बेकारीमुळे आर्थिक,सामाजिक आणि मानसिक संकटांचा उद्भव होतो, ही नव्याने सांगण्यासारखे नाही. तसेच कुशल मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात घाट होऊन गरीबी, बेकारी, वेठबिगारी, लुटमारी, अस्थिरता, नैराश्य इत्यादी प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण होतात. ही स्थिती लक्षात घेता कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यातील दरी भरून काढायची जबाबदारी या मंत्रालयावर सोपविण्यात आलेली आहे. वर्तमानसोबतच भविष्यातील गरज विचारात घेऊन कौशल्यविकासाची जबाबदारी या मंत्रालयाला पार पाडावयाची आहे. अशाप्रकारे 'कौशल्यसंपन्न भारत' निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय

कौशल्य विकास अभिकरण, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ व राष्ट्रीय कौशल्य कोष हे विभाग मंत्रालयात कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे राज्यात विभागीय कौशल्य मंडळे कार्यान्वित असून तत्सम १८७ सहयोगी शिक्षण संस्था देखील कार्यरत आहेत. हे सर्व स्वागताहार्य असले तरी दिवास्वप्नात रंगून जाण्याचे कारण नाही. भारतास कौशल्यसंपन्न राष्ट्र बनवायचे असेल तर प्रत्येक काम सरकारने केले पाहिजे ही वृत्ती सोडून प्रत्येकाने स्वतः झटले पाहिजे. भारतासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षण ही संकल्पना तशी नवीन नाही. आपल्या पुरातन शिक्षण पद्धतीत शिष्य गुरूच्या आश्रमात राहून ज्ञानार्जनाबरोबरच विविध प्रकारचे कौशल्य आत्मसात करीत असत. कालमानपरत्वे त्याचे स्वरूप आज बदललेले दिसते.

आजच्या आधुनिक युगात माणसाचे जीवन प्रचंड गतिमान झाले असून त्याच्या गरज व अपेक्षा वाढल्या असून काळानुसार बदललेल्या आहेत. भविष्याचा वेध घेता आधुनिकरणाच्या काळात आणखी झपाट्याने गतिमान होणार आहेत. एकंदरीत या परिस्थितीचा विचार केल्यास उद्याच्या नागरिकांमध्ये म्हणजे आजच्या विद्यार्थ्यांमध्ये जागतिक नागरिकत्वाचा विकास करण्यासाठी कौशल्यांचा विकास शिक्षणाच्या सर्व स्तरातून सर्वांगाने होणे आवश्यक आहे. मनुष्यजीवनाचा विकास साधण्यासाठी कौशल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कौशल्यांचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्राप्त करण्याची अभियोग्यता कोणत्याही प्राण्याला निसर्गात: प्राप्त झालेली असते. जसे माकडाच्या पिलाला झाडावर उडया मारणे शिकवावे लागत नाही. अनुकरणाने ही सारे कौशल्ये तो अंगीकृत करीत असतो. तसेच नैसर्गिक क्षमतेचा विकास करून, परिश्रमाने कौशल्य हस्तगत करावे लागते, अर्थात प्राविण्य प्राप्त करावे लागते. थॉमस एडिसन म्हणतात," एखाद्या कार्यातील यशामध्ये बुद्धी आणि प्रेरणेचा वाट हा केवळ एक टक्का असतो, तर परिश्रमाचा वाट हा नव्व्यान्नव टक्के असतो." खरोखरच एडिसन यांचे विधान मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून तंतोतंत लागू होते. कौशल्यप्राप्तीमध्ये स्नायू आणि मेंदू यांचे बरोबर ज्ञान व भावना यांचा समन्वय आवश्यक असतो.

कौशल्ये ही प्रामुख्याने दोन प्रकारची असतात- दृढ कौशल्ये व मृदू कौशल्ये. दृढ कौशल्ये ही प्रत्यक्ष कृतीशी संबंधित असतात, तर मृदू कौशल्ये मानवीय वर्तनाशी निगडित असतात. खेळणे, यांत्रिक दुरुस्ती यासारखी कौशल्ये दृढ कौशल्ये होत, तर सामाजिक, भावनिक, वैचारिक इत्यादीसंबंधित असणारे मृदू कौशल्ये होत. दृढ कौशल्यांचा बाबतीत अनुकरण, क्रियाकौशल्य, अचूकता, संधिकारां आणि नैसर्गीकरण अशा पायऱ्या यशस्वीपणे पार करून एखाद्या विशिष्ट कौशल्यात नैपुण्य मिळविता येते तर मृदू कौशल्ये ही अधिक गुंतागुंतीची असल्यामुळे त्यातील पायऱ्या स्पष्ट करता येत नाहीत. संबंधित व्यक्तीच्या वर्तनावरून त्याच्यासोबत घडून आलेल्या आंतरक्रियांवरून एखादे कौशल्य त्या व्यक्तीमध्ये आहे किंवा नाही याचे आकलन करता येते. गोयल आणि गोयल (२०१४) यांनी मनुष्य जीवनाकरिता आवश्यक कौशल्यांची विभागणी पुढीलप्रमाणे १२ वर्गांमध्ये केली आहे. या कौशल्यांचा आपण पुढे रीतसर विचार करणार आहोत.

**१) स्वयंविकास कौशल्ये:** स्वयं विकास कौशल्यांमध्ये प्रामुख्याने स्वतःच्या आवश्यकतांची व अध्ययन गरजांची ओळख पटविणे व त्या गरज पूर्ण करण्यासाठी सुयोग्य संसाधने जुळविणे, तसेच आवश्यकतेनुसार उपलब्ध साधनांचा जास्तीतजास्त उपयोग करून आपला विकास साधने अभिप्रेतआहे. एका विशिष्ट स्थितीत प्राप्त केलेले ज्ञान वा कौशल्य नवीन स्थितीत वापरण्याची क्षमता सुद्धा अपेक्षित आहे. त्याशिवाय प्राप्त ज्ञानाचा उपयोग स्वयं विकासासाठी करता येणार नाही.

**२) सामाजिक कौशल्ये:** यामध्ये प्रामुख्याने आंतरव्यक्तीसंबंध , संवाद, कौशल्ये, सामाजिक जबाबदारीची जाणीव, मानवीय संबंध कौशल्ये उदा. स्वयंशिस्त, समानुभूती इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव होतो. याबरोबरच भावनात्मक,समायोजन, नागरिकत्वासंबंधित, अनुकूलन इत्यादी कौशल्यांचा यामध्ये समावेश होत असल्याने या कौशल्याचे क्षेत्र अतिशय व्यापक असे आहे.

**३) जीवन कौशल्ये:** 'स्व' ची जाणीव, सामानानुभूती, समस्या निराकरण, निर्णयक्षमता, परिणामकारक संप्रेषण, व्यक्ती-व्यक्तींमधील सहसंबंध, सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, भावनांचे समायोजन, ताणतणावांचे समायोजन इत्यादी कशल्यांचा यामध्ये समावेश होतो.

**४) तर्कशुद्ध विचार कौशल्ये:** आपल्या शिक्षण पद्धतीत असलेला एक दोष असा कि, विद्यार्थ्यास प्रश्न विचारण्याची किंवा स्वतःचे मत व्यक्त करण्याची संधी दिली जात नाही. परीक्षेत चांगले गन संपादन करणारे विद्यार्थी सुद्धा आपले मत मांडू शकत नाही. म्हणजेच त्यांची वैचारिक क्षमता विकसित झालेली दिसून येत नाही. शिक्षणाच्या माध्यमातून विवेकपूर्ण विचार मांडण्याच्ये कौशल्य निर्माण होणे अपेक्षित आहे. कार्यकारणभावावर आधारित कौशल्येसुद्धा अतिशय महत्त्वाचे ठरतात. जसे, अंशाकडून-पूर्णाकडे, नाकारात्मकतेकडून-साकारात्मकतेकडे, संकुचितपणाकडून-व्यापकतेकडे याप्रमाणे इत्यादी.

**५) संशोधन कौशल्ये:** जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात संशोधनाला अनन्यसाधारण स्थान प्राप्त झालेले आहे. संशोधन हाच प्रगतीचा पाया असून या दृष्टिकोनातून विचार केल्यास एखादी समस्या ओळखण्याचे कौशल्य व ती समस्या परिभाषित करून त्याची उद्दिष्टे, परिकल्पना, संशोधन आराखडा इत्यादी तयार करून संशोधन प्रक्रिया पार पाडण्याचे कौशल्य, माहिती विश्लेषण, निष्कर्ष काढण्याचे कौशल्य, उपयोजन व नवीन सिद्धांड मांडण्याचे कौशल्य संशोधनामध्ये महत्वाची असतात. ही कौशल्ये प्रत्येक नागरिकात विकसित होणे अपेक्षित असते.

**६) रचनात्मक कौशल्ये:** 'व्यक्ती अनुभवातून शिकतो' किंवा 'अनुभव हाच गुरु' असे म्हटले जाते ते अगदी खरे आहे. माणूस हा जन्मापासून मृत्यूपर्यंत ज्ञानार्जन करीत असतो. विद्यार्थ्यांना अनुभवातून मिळालेले ज्ञान हे कायमस्वरूपी किंवा टिकाऊ स्वरूपाचे असते,परंतु विद्यार्थ्याने वाचून, ऐकून, पाहून प्राप्त केलेले ज्ञान व कौशल्ये हे टिकाऊ असते असे म्हणता येणार नाही. पण प्रत्यक्ष अनुभवातून व प्रात्यक्षिकातून मिळवलेले ज्ञान अथवा कौशल्ये ही चिरस्थायी स्वरूपाची असतात. विद्यार्थी प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या आधारे नवीन ज्ञानाची निर्मिती करतो किंवा रचना करतो. म्हणजेच रचनात्मक कौशल्यांचा विकास अतिशय महत्त्वाचा ठरतो.

**७) प्रणाली विचार कौशल्ये:** कोणतेही कार्य करण्यासाठी किंवा कौशल्ये हस्तगत करण्यासाठी एखादी विशिष्ट कार्यपद्धती अवलंबावी लागते. एखादे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी त्याकडे समग्र दृष्टिकोनातून पाहणे, कमीतकमी वेळेत, कमीतकमी खर्चात, पूर्ण क्षमतेनिशी व कठोर परिश्रमाने ते कार्य यशस्वी करण्यासाठी जो विचार किंवा नियोजन करून आखणी करण्याचे कौशल्य लागते ती क्षमता म्हणजे प्रणाली विचारक्षमता होय. हे सुद्धा आवश्यक आहे.

**८) माहितीयुग कौशल्ये:** वर्तमान काळ हा माहिती तंत्रज्ञाचा काळ आहे. वैज्ञानिक साक्षरता, संगणक व तंत्रज्ञानाशिवाय जगणे कठीण आहे. त्यामुळे माहिती व तंत्रज्ञानासंबंधीची कौशल्ये विकसित करणे आजच्या काळात अनिवार्य झाले आहे. विद्यार्थ्यांना आंतरजालाचा वापर करून फेसबुक, ट्विटर,यासारख्या संप्रेषण साधनांचा वापर करावा लागणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स अध्यापन साहित्याचा व साधनांचा वापर आवश्यक आहे. म्हणून आजच्या आधुनिक युगात व्यक्तीला प्रभावीपणे जीवन जगण्यासाठी माहितीयुग जीवनकौशल्याची नितांत गरज आहे.

**९) नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन कौशल्ये:** संस्था आणि समाजकेंद्रीत अनेक कौशल्यांचा यांमध्ये समावेश होतो. नियोजन, संघटन, समन्वय, वेळेचे व्यवस्थापन, प्राधान्यक्षमता ठरविणे, सहयोग प्राप्त करण्याचे कौशल्य इत्यादी अनेक प्रकारची कौशल्ये आत्मसात करणे याठिकाणी अभिप्रेत आहे.

**१०) अध्यात्मिक विकास कौशल्ये:** मानवी जीवनाचा अर्थ व ध्येय समजून घेण्याचे कौशल्य, जीवनमूल्यांचे आकलन व आचरण, प्रेम, बंधुभाव, समता, समर्पण इत्यादी बाबींचा वापर करण्याचे कौशल्य याप्रकारच्या कौशल्यांचा विचार यामध्ये केला जातो. जीवनात विश्वास व श्रद्धा कोणावर कसा, किती ठेवावा हे सुद्धा एक कसाब किंवा कौशल्यच आहे. अध्यात्मिक कौशल्यामध्ये धर्म पंत यांचा विचार न करता 'स्व' आत्मानुभूतीचा विकास अभिप्रेत आहे. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास नसणारा, स्वतःची बलस्थाने, उणीवा माहित नसणारा विद्यार्थी आजच्या शिक्षणातून घडवला जात आहे. त्यासाठी स्वतःचा आत्मविश्वास निर्माण करणे हे सुद्धा एक महत्त्वपूर्ण कौशल्य आहे नि आजच्या आधुनिक युगात व्यक्तीला प्रभावीपणे जगण्यासाठी ते पदोपदी उपयुक्त ठरणारे आहे.

**११) योग कौशल्ये:** आपल्या व्यक्तिमत्त्वाचे शारीरिक, मानसिक, भावनिक , अध्यात्मिक व सामाजिक असे विविध पैलू असतात. या सर्व पैलूंमध्ये संतुलन राखण्याचे कार्य योग्य कशल्ये करतात. योग हा विषय व्यक्तिनिष्ठ व आत्मसाक्षात्कारी आहे. शरीर, मन आणि विचार हे जेव्हा दूषित होतात तेव्हा शारीरिक व मानसिक प्रदूषण होण्यास सुरुवात होते. त्यामुळे सदोष विचार, अविचार, दुर्विचार आणि कुविचार

नष्ट करण्याची कुवत योगकौशल्यांमध्ये आहे. यामुळे जीवनाला स्थैर्य प्राप्त होते. दैनंदिन ताणतणाव कमी होऊन मनोकायिक स्थिरता व शांततेचा अनुभव घेता येतो. आणि म्हणून योगकौशल्यांना शिक्षणात अभूतपूर्व महत्त्व देण्यात आले आहे.

**१२) समग्र विकास कौशल्ये:** व्यक्तिमत्त्वाचा विकास साधने हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय्य असल्यामुळे विद्यार्थ्यांचा ज्ञानात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक विकास साधता येणाऱ्या सर्व स्थूल- सूक्ष्म , मूर्त-अमूर्त, तसेच दृढ-मृदू कौशल्यांचा यांमध्ये समावेश होतो.

कौशल्याधिष्ठित शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेता, कौशल्यांचे वर्गीकरण वरीलप्रमाणे करण्यात आलेली आहेत. कौशल्यांचे क्षेत्र इतके व्यापक आहे कि, त्यांना शब्दांमध्ये बंदिस्त करणे अवघड होईल. केवळ उपरोक्त वर्गीकरण हे आकलनाच्या हेतूने घेतले असून ते सर्वसमावेशक आहेत असे म्हणता येणार नाही.आजचा विद्यार्थी केवळ परीक्षार्थी बनत चालला आहे असे चित्र दिसून येते. त्यामुळे कौशल्य विकासामध्ये शिक्षकाची भूमिका अतिशय महत्त्वाची असणार आहे. शिक्षण हे संकुचित न बनता मातीशी इमान राखणारी नवीन शिक्षणप्रणाली निर्माण होण्याची गरज आहे. कौशल्याधिष्ठित शिक्षण म्हणजे ज्ञानामृतासाठी पेटवलेला 'दीप ' आहे. या दीपातून असंख्य दीपज्योती पेटल्या जाव्यात. ज्ञानामृताचे दिव्य तेज सर्वत्र फाकले जावे. अर्थात, शिक्षणाची चळवळ अधिक सक्षम, समृद्ध आणि संपन्न व्हावी , हीच अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करण्यात येत आहे.

## कौशल्याधिष्ठित शिक्षणाचे फायदे:

१. यामुळे विद्यार्थ्याला  शिकण्याचे विश्लेषण करण्यास आणि आकलनातील अंतर कमी करण्यास मदत करते.
२. कौशल्याधिष्ठित शिक्षण हे व्यावहारिक शिक्षणासाठी अधिक प्रोत्साहित करतात व स्वावलंबी बनविते.
३. कौशल्य-आधारित शिक्षणाने विद्यार्थी  स्वयंपूर्ण बनतो व त्याने निवडलेल्या करिअरसाठी भविष्यात कार्यक्षम राहतो.
४. मुलांची सर्जनशीलता कौशल्ये वाढवण्यासाठी कौशल्य-आधारित शिक्षण अपरिहार्य आहे जे त्यांच्या इतर कौशल्ये आणि विशिष्ट क्षमतांचा विस्तार करण्यासाठी फायदेशीर ठरते.
५. कौशल्याधिष्ठित शिक्षणाचा हा अभिनव दृष्टिकोन विद्यार्थ्यांना वास्तविक जगाशी स्पर्धा करण्यास सज्ज करतो.
६. विद्यार्थ्यांमध्ये भावनिक बुद्धिमत्तेचा विकास होऊन सांघिक व सहकार्याची भावना वाढीस लागते.
७. जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आवश्यक असणारी प्रभावी संप्रेषण कौशल्ये विकसित करण्यासाठी कौशल्याधिष्ठित शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते.
८. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होऊन चिकित्सक व वैज्ञानिक दृष्टी वाढीस लागते.
९. विद्यार्थ्यांवर नागरिकत्वाचे योग्य संस्कार होऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडून येतो.
१०. कौशल्याधिष्ठित शिक्षणाने व्यक्ती सर्वसमावेशक बनून समाजातील सामाजिक आरोग्य पवित्र ठेवण्याचा मानस ठेवतो.

## समारोप:

आधुनिक जगात व्यक्तीला कौशल्याधिष्ठित शिक्षणातून यशस्वी जीवन जगण्याचा आत्मविश्वास मिळतो. पारंपरिक शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थी हा चाकोरीबद्ध शिक्षण घेतो परंतु दैनंदिन, व्यावहारिक जीवनात पाहिजे तसा यशस्वी होऊ शकत नाही. कालानुरूप विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उज्वल भवितव्याच्या दृष्टीने विचार करण्याची वेळ आली आहे.  शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांनी स्वतःशी प्रामाणिक राहून सामंजस्याने व सहकार्याने कौशल्याधिष्ठित शिक्षणाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या संधी एकाच वेळी मिळतील. परिणामतः विद्यार्थ्यांना भविष्यकालीन आव्हाने पेलणे शक्य होईल, सोपे होईल आणि 'राष्ट्रनिर्माण' हे शिक्षणाचे उद्दिष्ट साध्य करता येईल.